# शासकीय तंत्रनिकेतन अंबड

म्हाडा कॉलनी पाचोड रोड, अंबड जि.जालना

दुरध्वनीक्रं. (०२४८३) २२००१०, फॅक्सक्र. (०२४८३) २२००१०

E-mail : gpambad.dte@gmail.com

जा.क्र. शातंअं/विवि/शिष्यवृत्ती/२०१८/ 2143                    दि. ०८ ऑक्टोबर २०१८

## इ.बी.सी.,पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्जाबाबत महत्वाची सुचना

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थेत प्रवेशित सर्व अभ्यासक्रमाच्या, इ.बी.सी. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती तसेच मागासवर्गीय शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या महा-डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास सुरवात झालेली आहे.

तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपले शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरावेत. ऑनलाईन अर्ज भरताना सर्व आवश्यक मुळ कागदपत्रांचे फोटो अपलोड करावेत. मुळ कागदपत्रे अपलोड न केल्यास विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती अर्ज फेटाळण्यात येईल. इ.बी.सी., अल्पसंख्याक शिष्यवृत्ती तसेच पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्ता योजनेच्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन तपासले जाणार असल्याने त्यांनी अर्ज **भरल्यावर अर्जाची प्रिंट किंवा कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती कार्यालयात जमा करण्यात येवू नयेत.**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रतींचे फोटो संकेतस्थळावर अपलोड करावेत व अर्ज पुर्ण भरल्यानंतर अर्जाची एक प्रत आवश्यक सर्व कागदपत्रांच्या प्रतीसह शिष्यवृत्ती विभागात जमा करावेत.

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सर्व विद्यार्थ्यांनी आपले अर्ज लवकरात लवकर भरावे जेणेकरून सर्व अर्ज लवकर तपासुन वरीष्ठ कार्यालयास वेळेत पाठविण्यात येतील व सर्व विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेत विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल. जर विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत आपले शिष्यवृत्ती अर्ज कार्यालयात जमा केले नाही तर होणा-या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील व अशा विद्यार्थ्यांकडुन शैक्षणिक शुल्काची रक्कम रू. ६०००/- वसूल करण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन अंबड

प्रत :- १) मुख्य सुचनाफलक २. सर्व विभागप्रमुख शा.तं.अंबड यांना देवून सुचित करण्यात येते की, सदर सुचना आपल्या विभागातील सुचना फलकावर लावण्यात यावी.

३. विभागप्रमुख संगणक यांना देवून सुचित करण्यात येते की, सदर सुचना संस्थेच्या सुचनाफलकावर अपलोड करण्यात यावी.